# **जाहीर नोटीस**

## [माहे नोव्हेंबर-2020 मध्ये मुदत संपलेली नगरपंचायत मंडणगड सार्वत्रिक निवडणूक]

ज्याअर्थी, मा.सचिव, राज्य निवडणुक आयोग,महाराष्ट्र यांचेकडील पत्र क्र.रानिआ/नप-2020/प्र.क्र.6/का.06 दिनांक 12/10/2020 रोजीच्या पत्रान्वये रत्नागिरी जिल्हयातील मंडणगड नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीकरीता प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम जाहीर केला होता. तसेच मा.राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील आदेश क्र.रानिआ/नप-2020/प्र.क्र.6/का-06, दि.13/11/2020 रोजीचे पत्रान्वये प्रारुप प्रभाग रचनेसंदर्भात अंशतः सुधारीत कार्यक्रम दिला होता. त्याप्रमाणे प्रभाग रचना अंतिम करुन प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि, आता क्र.रानिआ/नपं-2021/प्र.क्र.03/का.06, दिनांक 12/11/2021 रोजीचे पत्रान्वये मंडणगड नगरपंचायतीच्या सदस्य पदाच्या(ना.मा.प्र.) आरक्षणाच्या फेर सोडतीकरिता सुधारित आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम मा.राज्य निवडणूक आयोगाने प्रसिध्द केला आहे.

आणि ज्याअर्थी, मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील सुधारीत आदेश क्र.रानिआ/नपा-2020/प्र.क्र.1/का-6, दि.06/02/2020 मधील तरतूद क्र. 9 नुसार प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करण्यापूर्वी संबंधित नगरपरिषद /नगरपंचायतीच्या क्षेत्रांमध्ये सभा आयोजित करुन सोडत पध्दतीने अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग/नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिला व सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षण निश्चित करणे बंधनकारक आहे.

त्याअर्थी, मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील दिनांक 09/11/2021 रोजीचे पत्रांमधील कार्यक्रमानुसार मंडणगड नगरपंचायतीची प्रारुप प्रभाग रचना मुख्याधिकारी, नगरपंचायत मंडणगड यांनी सादर केली असून सदर प्रारुप प्रभागरचना प्रसिध्द करण्यापूर्वी मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे आदेश दिनांक 06/02/2020 मधील तरतुदीप्रमाणे तसेच उक्त दि.12/11/2021 रोजीच्या आदेशानुसार मंडणगड नगरपंचायतीच्या सदस्यपदांच्या (ना.मा.प्र.) आरक्षणाची फेरसोडत निम्न नमूद ठिकाणी व नमूद दिनांकास आयोजित करण्यात आली आहे. कोविड-19 संबंधित निकषांचे तंतोतंत पालन करुन सदर सोडतीसमयी नागरिकांनी उपस्थित रहाणेस्तव या जाहीर नोटीसीव्दारे आवाहन करण्यात येत आहे.

| **अ. क्र.** | **नगरपंचायतीचे नांव** | **ज्यांच्या अध्यक्षतेखाली सोडत काढण्यात येणार आहे, ते प्राधिकृत केलेले उपजिल्हाधिकारी** | **आरक्षण सोडतीचे स्थळ** | **दिनांक व वेळ** |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | नगरपंचायत मंडणगड | उपविभागीय अधिकारी, खेड | डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, बाणकोट रोड, शिवाजी नगर, मंडणगड, ता. मंडणगड जि. रत्नागिरी | सोमवार, दि. **15/11/2021** दु **2.00** वाजलेपासून |

**सही/-**

**(डॉ.बी.एन.पाटील)**

**जिल्हाधिकारी, रत्नागिरी**

**ठिकाण** - रत्नागिरी

**दिनांक** - 13/11/2021